# दक्षिण भारतातील वन्यजीव स्थळं

अतुल धामनकर


रिया पब्लिकेशन्स्

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी

शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.

riyapublications@gmail.com

www.ajabgroup.com

**दक्षिण भारतातील वन्यजीव स्थळं**
अतुल धामनकर

© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
अतुल धामनकर
पटेल हायस्कूलसमोर,
शिवाजी चौक, चंद्रपूर - ४४२४०२
मो. न. : ७६२०७९२२०६, ९४२३६१९९३३
E mail : atultiger@rediffmail.com.

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २००/-

# लेखकाचे मनोगत

भारत हा नैसर्गिक साधनसंपत्तीने अतिशय संपन्न असलेला देश आहे. इथे कोणत्याही भागात गेलं तरी तुम्हाला संस्कृतीच्या विविधतेसोबत जैवविविधतेचाही आनंद घेता येतो. अगदी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातच्या पश्चिमी टोकापासून अरुणाचल प्रदेशच्या पूर्व टोकापर्यंत भारतातील वन व वन्यजीवांमध्ये कमालीचं वैविध्य आहे. या वन्य जीवनाबद्दल अभ्यासपूर्ण लेखन मागील काही वर्षांत बरंच झालंय. त्यांच्यासोबतच आज विविध दूरदर्शन वाहिन्यांवरूनदेखील वन्यजीवांच्या अंतरंगात डोकावणारे अभ्यासपूर्ण अनेक कार्यक्रम अव्याहतपणे सुरू असतात. साहजिकच आज सामान्य लोकांमध्येदेखील वन व वन्यजीवांविषयी फार उत्सुकता जागृत झाली आहे. त्याच उत्सुकतेतून ते भारतातील अनेक व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्यानं आणि वन्यजीव अभयारण्यांना भेटी देऊन तिथे नैसर्गिक अवस्थेतील वन्य जीवन न्याहाण्याचे आणि त्याला कॅमेराबद्ध करण्याचे ठरवतात.

पण असं असलं तरी वन्यजीव निरीक्षणाला सहज कुठल्याही पर्यटनासाठी बाहेर पडावं, तसं जाऊन चालत नाही. वन्यजीव क्षेत्रे नेहमीच दूरवर वसलेली असतात. बहुधा त्यांच्या आसपास मोठी शहरं-गावंही नसतात. त्यामुळे इथे जाण्यासाठी बरीच पूर्वतयारी करणं आवश्यकच ठरतं.

अशा जंगल भेटीसाठी बाहेर पडण्यापूर्वीच त्याची नीट माहिती करून आखणी करणं अतिशय गरजेचं असतं. त्यामुळे सगळ्यात आधी त्या अरण्याची इत्थंभूत माहिती मिळवणं, कुठून कसं जायचं हे ठरवणं, विमान, रेल्वे, बस, खासगी टॅक्सीची तिकिटं किंवा अग्रीम आरक्षण करणं, प्रवेशपत्र प्राप्त करणं, हॉटेल किंवा वनविश्रामगृहाचं आरक्षण करणं, त्या जागी कोणकोणते वन्य प्राणी-पक्षी आढळतात त्याची आधीच माहिती करून त्यांच्या निरीक्षण किंवा प्रकाशचित्रणासाठी काय-काय करावं लागेल, कोणती फोटोग्राफी उपकरणं सोबत घ्यावी लागणार याची आखणी करणं, हे मोठंच काम असतं. अशा वेळी अगदी छोट्याशा माहितीअभावी देखील तुमची भटकंती गोत्यात येऊ शकते. कित्येक वेळा एखाद्या बाबीची माहिती नसल्याने प्रत्यक्ष त्या अरण्यात गेल्यावर जंगलफेरी न मिळणे, हॉटेल न मिळणे, वाहतुकीच्या साधनांची कमतरता यासारख्या बाबी तुमचा भ्रमंतीचा आनंदच हिरावून घेऊ शकतात.

आज बऱ्याच वन्यजीव क्षेत्रांत अनेक टूर ऑपरेटर्स भ्रमंती आयोजित करून देतात; पण इथे जाताना या टूर ऑपरेटर्सना फक्त हॉटेल-टॅक्सी बुकिंगशिवाय इतर कुठल्या बाबतींची माहिती आहे की नाही, हे आपल्याला माहीत नसतं. खासकरून वन्यजीव, त्यांचा आढळ, त्यांची स्थळं, वन्यजीव निरीक्षण व फोटोग्राफीच्या संधी या बाबी अशा टूर ऑपरेटर्सना माहिती आहेत काय, हे आधीच तपासून घ्यावं. कारण एखाद्या ऐतिहासिक किंवा धार्मिक स्थळाला भेट देण्यासारखं वन्यजीव पर्यटन नक्कीच नसतं. त्यात शेवटी तुम्हाला प्रवास, राहणं-खाणं या बाबींसोबतच उत्तम वन्यजीव निरीक्षणाच्या संधी मिळणंही तेवढंच महत्त्वाचं असतं. असं न झाल्यास तुमच्या अरण्यभेटीचा आनंदच कमी होऊन हिरमोड होऊ शकतो.

निसर्गात जाताना मनात उत्साह असला तरी काही अवास्तव कल्पना घेऊन मुळीच जाऊ नये. उदा. मी ताडोबाला जातोय ते वाघच बघायला चाललोय, असे बरेच जण सांगतात; पण असं करताना त्यांना वाघ हा जंगलातील अत्यंत लपून-छपून वावरणारा, धूर्त शिकारी प्राणी आहे, या गोष्टीचं भान नसतं. निसर्गाने त्याला जंगलातील कुठल्याही अधिवासात बेमालूमपणे मिसळून जाण्याची अद्वितीय अशी देणगी दिली आहे. त्यामुळेच तो अतिशय चौकस, तीक्ष्ण नाक, कान, डोळे असणाऱ्या चितळ, सांबर, रानगवे यांची शिकार करू शकतो. साहजिकच तो या जनावरांच्या तुलनेत कितीतरी कमी इंद्रियसंवेदना असलेल्या माणसापासून सहजपणे लपू शकतो. त्यामुळे वाघ बघण्याचा प्रयत्न करणं हा वन्यजीव पर्यटनातला एक भाग झाला; पण वाघच दिसला पाहिजे हा अट्टाहास चुकीचाच ठरतो. त्याशिवायदेखील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात आणखी ४४ प्रजातींचे सस्तन प्राणी आणि २८० पेक्षा जास्त प्रकारचे रंगीबेरंगी पक्षीपण आहेत, हे लक्षात ठेवावं. म्हणजे तुम्ही जंगलात फिरताना तुम्हाला लगेचच वाघ दिसेल असं होणार नाही; पण बरेच पक्षी, प्राणी हे नक्कीच दिसतील. त्यामुळे त्यांच्याकडे डोळसपणे बघणं, त्यांचं निरीक्षण करणं हा आनंद तुम्ही भरपूर प्रमाणात घेऊ शकता. पुढे जेव्हा तुम्हाला कधीही वाघ दिसेल तेव्हा तो आनंद द्विगुणित होईल, याची खात्री बाळगा.

आजकाल निसर्ग पर्यटनाला निघताना अनेकजण कुटुंबासह मित्रफोटोग्राफर्सचा ग्रुप किंवा लहान-मोठ्या गटाने जातात. त्यावेळी प्रत्येकाचा निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो; पण निसर्ग, वन्य जीवन हे आपल्या ताब्यात नाही, तसेच त्यांना कुठल्याही वेळेचे बंधनसुद्धा नसते, हे नीट ध्यानात ठेवावं. त्यामुळे एखाद्या स्थळाला भेट देण्यासारखं न जाता या पर्यटनासाठी जास्तीचा वेळ ठेवावा. बरेचजण अशा जागी जातानादेखील धावती भेट देतात. जेव्हा कुणी मला गर्वाने सांगतात, की हो आम्हीसुद्धा भरतपूरला जाऊन आलोय आणि तिथे चांगलं दीड तास होतो, तेव्हा या वाक्यावर हसावं

की रडावं, हेच कळत नाही. जयपूरहून आग्ऱ्याला जाताना हे भोज्याला शिवल्यासारखं वाटेतल्या भरतपूरला फक्त हात लावून येतात. खरं तर युनेस्कोची 'वर्ल्ड हॅरिटेज साईट' असलेलं भरतपूर जगातलं एक उत्कृष्ट पक्षी अभयारण्य आहे. इथे कमीत कमी ३-४ दिवस घालवले नाही, तर तुम्ही त्याचं नीट निरीक्षणसुद्धा करू शकणार नाही. त्यामुळेच कुठेही निसर्ग पर्यटनाला जाताना चार दिवसांत तीन अभयारण्ये किंवा सहा दिवसांत चार-पाच जंगलांना भेटी देण्याचे प्रोग्राम मुळीच आखू नयेत. त्यामुळे तुम्हाला कोणत्याही जंगल व त्यातील वन्यजीवांचे नीट अवलोकन करायची संधी मिळणार नाही. साहजिकच तुमचे वन्यजीव निरीक्षणाबद्दलचे मत कलुषित होण्याची शक्यता असते. आम्ही चांगले एक दिवस ताडोबात होतो आणि तरीही आम्हाला वाघ दिसला नाही, असे म्हणणाऱ्यांना मी नेहमी सांगतो की, इथे तुम्ही तीन-चार दिवस राहून कमीत कमी चार ते सहा जंगल सफारी केल्या तरच तुम्हाला नीट वन्यजीव निरीक्षण करायची संधी मिळू शकेल.

कुठलाही वन्य प्राणी खात्रीशीर दिसणं ही बाब गृहीत धरणं हेच चुकीचं आहे. 'वन्य' या शब्दातच ते ध्वनित होतं. वन्य जीवन हे ठरवून बघता येत नाही, यातच त्याची गोडी आणि आनंद टिकून असतो. त्यामुळे पुढे काय घडणार, काय दिसणार, ही हुरहूर तुम्हाला परत-परत त्याच जंगलाकडे आकृष्ट करते. त्यामुळे बरेच निसर्गप्रेमी सतत, एकाच जंगलाच्या वर्षानुवर्षे वाऱ्या करूनदेखील कंटाळत नाहीत.

मी या पुस्तकात जंगल व वन्यजीव पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक गोष्टींचा अंतर्भाव करायचा प्रयत्न केला आहे. मी मागील २३ वर्षे भारतातील विविध अरण्यांतून वन्यजीवांचं निरीक्षण, अभ्यास आणि प्रकाशचित्रणासाठी भटकंती करतोय. त्यातुनच आलेल्या अनुभवांवर हे पुस्तक आधारीत आहे. त्यामुळे याचा निसर्गप्रेमी भटक्यांचा भरपूर उपयागे होईल, अशी अपेक्षा आहे. त्या शिवाय कुणाला आणखी काही माहिती हवी असल्यास त्यांनी खालील मोबाईल नंबर किंवा ईमेलवर माझ्याशी संपर्क साधावा.

भारतातील पश्चिम, पूर्व, दक्षिण, उत्तर आणि मध्य या पाच भागांवरील मालिकेतील 'दक्षिण भारतातील वन्यजीव स्थळं' हे पुस्तक तुमच्या हाती देताना खूप आनंद होतो आहे. यासाठी मी माझे प्रकाशक व इतर प्रत्येकांचा ज्यांचा हातभार या पुस्तकाच्या निर्मितीसाठी लागला आहे त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

धन्यवाद!

आपला
अतुल धामनकर

✦✦✦



# अनुक्रमणिका



| | | |
|---|---|---|
| १) | नागार्जुनसागर श्रीशैलम् व्याघ्र प्रकल्प.......................... | ११ |
| २) | बांदीपूर व्याघ्र प्रकल्प.......................................... | १३ |
| ३) | नागरहोळे व्याघ्र प्रकल्प........................................ | १५ |
| ४) | भद्रा व्याघ्र प्रकल्प............................................. | १७ |
| ५) | पेरियार व्याघ्र प्रकल्प.......................................... | १९ |
| ६) | अनमलाई व्याघ्र प्रकल्प......................................... | २१ |
| ७) | कालक्काड मुंडनथुराई व्याघ्र प्रकल्प........................... | २३ |
| ८) | मुदुमलाई व्याघ्र प्रकल्प........................................ | २५ |
| ९) | परंबीकुलम व्याघ्र प्रकल्प....................................... | २७ |
| १०) | अनशी दांडेली व्याघ्र प्रकल्प.................................. | २९ |
| ११) | सथ्यमंगलम् व्याघ्र प्रकल्प..................................... | ३१ |
| १२) | बी. आर. टी. व्याघ्र प्रकल्प................................... | ३३ |
| १३) | कुद्रेमुख व्याघ्र प्रकल्प......................................... | ३५ |
| १४) | कावल व्याघ्र प्रकल्प........................................... | ३७ |
| १५) | बनेरघट्टा राष्ट्रीय उद्यान........................................ | ३९ |
| १६) | कॅम्पबेल बे राष्ट्रीय उद्यान..................................... | ४१ |
| १७) | इराविकूलम राष्ट्रीय उद्यान...................................... | ४३ |
| १८) | गलाथिया राष्ट्रीय उद्यान....................................... | ४५ |
| १९) | ग्युंडी राष्ट्रीय उद्यान........................................... | ४७ |
| २०) | ग्लफ ऑफ मन्नार मरीन राष्ट्रीय उद्यान ........................ | ४९ |
| २१) | महात्मा गांधी मरीन राष्ट्रीय उद्यान............................ | ५१ |
| २२) | मथिकेत्तन शोला राष्ट्रीय उद्यान................................ | ५३ |
| २३) | माऊंट हॅरिएट राष्ट्रीय उद्यान.................................. | ५५ |
| २४) | मुकुर्थी राष्ट्रीय उद्यान ......................................... | ५७ |
| २५) | पालानी हिल्स राष्ट्रीय उद्यान ................................. | ५९ |
| २६) | सॅडल पीक राष्ट्रीय उद्यान ..................................... | ६१ |

२७) सायलंट व्हॅली राष्ट्रीय उद्यान ................................. ६३
२८) श्री व्यंकटेश्वरा राष्ट्रीय उद्यान ................................. ६५
२९) पापीकोंडा राष्ट्रीय उद्यान ..................................... ६७
३०) नेलापट्टू पक्षी अभयारण्य ..................................... ६९
३१) गुंडला ब्रह्मेश्वरम् वन्यजीव अभयारण्य ........................ ७१
३२) पाखाल वन्यजीव अभयारण्य ................................. ७३
३३) कोलेरू लेक पक्षी अभयारण्य ................................. ७५
३४) इटूरनगरम वन्यजीव अभयारण्य ............................... ७७
३५) किन्नेरासानी वन्यजीव अभयारण्य ............................ ७९
३६) रोल्लापाडू वन्यजीव अभयारण्य .............................. ८१
३७) पुलिकट लेक पक्षी अभयारण्य ................................. ८३
३८) श्री लंकामल्लेश्वरा वन्यजीव अभयारण्य ...................... ८५
३९) कोंडिण्य वन्यजीव अभयारण्य ............................... ८७
४०) कोरिंगा वन्यजीव अभयारण्य ................................. ८९
४१) क्रिष्णा वन्यजीव अभयारण्य ................................. ९१
४२) प्राणहिता वन्यजीव अभयारण्य ............................... ९३
४३) पोचाराम वन्यजीव अभयारण्य ................................. ९५
४४) शिवराम वन्यजीव अभयारण्य................................. ९७
४५) मंजिरा वन्यजीव अभयारण्य .................................. ९९
४६) कंबलाकोंडा वन्यजीव अभयारण्य ............................ १०१
४७) मुकांबिका वन्यजीव अभयारण्य .............................. १०३
४८) मेलकोटे टेंपल वन्यजीव अभयारण्य .......................... १०५
४९) नुगू वन्यजीव अभयारण्य ...................................... १०७
५०) घाटप्रभा पक्षी अभयारण्य .................................... १०९
५१) अदीचुंचानागिरी वन्यजीव अभयारण्य ......................... १११
५२) भीमगड वन्यजीव अभयारण्य ................................ ११३
५३) ब्रह्मगिरी वन्यजीव अभयारण्य ................................ ११५
५४) कावेरी वन्यजीव अभयारण्य .................................. ११७
५५) गुडावी पक्षी अभयारण्य ...................................... ११९
५६) मंदागड्डे पक्षी अभयारण्य ...................................... १२१

| | | |
|---|---|---|
| ५७) | पुष्पगिरी वन्यजीव अभयारण्य ................................ | १२३ |
| ५८) | रंगनथिट्टू पक्षी अभयारण्य ................................... | १२५ |
| ५९) | राणीबेन्नूर काळवीट अभयारण्य .............................. | १२७ |
| ६०) | शरावथी व्हॅली वन्यजीव अभयारण्य .......................... | १२९ |
| ६१) | शेट्टीहल्ली वन्यजीव अभयारण्य .............................. | १३१ |
| ६२) | सोमेश्वरा वन्यजीव अभयारण्य ................................ | १३३ |
| ६३) | तालाकावेरी वन्यजीव अभयारण्य ............................. | १३५ |
| ६४) | वायनाड वन्यजीव अभयारण्य ................................ | १३७ |
| ६५) | नेय्यर वन्यजीव अभयारण्य ................................... | १३९ |
| ६६) | पिची-वाझहानी वन्यजीव अभयारण्य ......................... | १४१ |
| ६७) | चिम्मोनी वन्यजीव अभयारण्य ................................ | १४३ |
| ६८) | शेंदुरूनेय वन्यजीव अभयारण्य ................................ | १४५ |
| ६९) | चिन्नार वन्यजीव अभयारण्य ................................. | १४७ |
| ७०) | अरालम वन्यजीव अभयारण्य ................................ | १४९ |
| ७१) | पेप्पारा वन्यजीव अभयारण्य ................................. | १५१ |
| ७२) | थट्टेकाड पक्षी अभयारण्य .................................... | १५३ |
| ७३) | कुमाराकोम पक्षी अभयारण्य ................................. | १५५ |
| ७४) | मलबार वन्यजीव अभयारण्य ................................ | १५७ |
| ७५) | कालाक्कडू वन्यजीव अभयारण्य ............................. | १५९ |
| ७६) | कारीकिली वन्यजीव अभयारण्य ............................. | १६१ |
| ७७) | पॉईंट कॅलिमेर वन्यजीव अभयारण्य .......................... | १६३ |
| ७८) | श्रीविल्लीपुथूर वन्यजीव अभयारण्य ........................... | १६५ |
| ७९) | वेदांथंगल पक्षी अभयारण्य .................................. | १६७ |
| ८०) | जंगलात जाताना... ......................................... | १६९ |

✦✦





# नागार्जुनसागर श्रीशैलम् व्याघ्र प्रकल्प

## धोक्यातले अरण्य...

**राज्य :** आंध्र प्रदेश
**जिल्हा :** नालगोंडा, महबूबनगर, कुरनूल, प्रकासम् आणि गुंटूर.
**कुठे आहे :** आंध्र प्रदेशातील नागार्जुनसागर धरणाच्या परिसरात.
**अंतर :** हैदराबादपासून ३१६ कि.मी. वर.

**अरण्याबद्दल थोडंसं :** आंध्र प्रदेशातील नागार्जुनसागर धरणाजवळ असलेला, पाच जिल्ह्यांत विस्तारलेला 'नागार्जुनसागर श्रीशैलम व्याघ्र प्रकल्प' हे खऱ्या अर्थाने निसर्गसमृद्ध जंगल आहे. या जंगलाला १९८३ साली वन्यजीव अभयारण्य तर १९९२ साली व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देण्यात आला होता. पूर्वीच्या हैद्राबादच्या नवाबांचं खासगी शिकारक्षेत्र असलेलं हे जंगल आता नक्षलवाद व कमी संरक्षणासारख्या समस्येशी लढत आपलं अस्तित्व टिकवण्याची धडपड करीत आहे.

**कशी कराल भ्रमंती :** या अभयारण्यात ठरवलेल्या वाटेने वाहनातून फिरून वन्यजीव निरीक्षण करता येते.

**कशासाठी जाल :** वाघ, रानकुत्रा, खवल्या मांजर आणि अनेक प्रकारचे अरण्यपक्षी.

**जाण्याचा उत्तम काळ :** या व्याघ्र प्रकल्पात जाण्याचा चांगला काळ हा मार्च ते जून असा आहे.

**वनस्पती :** साग, बिजा, तेंदू, ऐन, धावडा, भेरा, पळस, जांभूळ, सावरी, गराडी, चारोळी, मोह, आपटा, बांबू.

**वन्य प्राणी :** वाघ, बिबळा, हनुमान वानर, रानडुक्कर, झिपरे अस्वल, रानकुत्रा, चांदी अस्वल, साळिंदर, ताडमांजर, खवल्या मांजर, चितळ, सांबर, नीलगाय, काकर, पिसोरी, चिंकारा, मुंगूस.

**पक्षीजीवन :** महाभृंगराज, नीलपुच्छ, वेडाराघू, मोठा कुहुवा, हरेवा, चष्मेवाला, स्वर्गनांचण, नीलमणी, थोरला धोबी, करण पोपट, टकाचोर, मुनिया, रानभाई, वटवट्या.

**सरपटणारे जीव :** नाग, घोणस, अजगर, घोरपड, मगर, तांबड्या पाठीचा झाडसाप, हरणटोळ, मांजऱ्या.

**कुठे-काय बघाल :** नागार्जुनसागर धरणाच्या परिसरात अनेक वन्य प्राणी-पक्षी दिसण्याची शक्यता असते.

**आसपासची बघण्यायोग्य स्थळं :**

१) इक्ष्वाकू चंद्रगुप्त साम्राज्याचे अवशेष

**कसे जाल :**

**जवळचे विमानतळ :** हैद्राबाद (३१६ कि.मी.)

**जवळचे रेल्वे स्टेशन :** मार्कापूर (८५ कि.मी.)

**जवळचे बस स्थानक :** श्रीशैलम्

**कुठे राहाल :**


१) वनविश्रामगृह हे मन्नानूर (४ खोल्या), श्रीशैलम् (२ खोल्या), बैरलुटी (२ खोल्या) इथे उपलब्ध आहे.

**आरक्षणासाठी संपर्क :**

क्षेत्र संचालक,
नागार्जुनसागर श्रीशैलम व्याघ्र प्रकल्प,
सुंबी पेंटा श्रीशैलम्, आंध्र प्रदेश-५१८१०२
फोन नं. : ०८५२४-८६०९८

२) याशिवाय पीडब्ल्यूडी गेस्ट हाऊस हेही नागार्जुनसागर इथे उपलब्ध आहे.

✦




**अरण्याबद्दल थोडंसं :** निलगिरी पर्वतांच्या अप्रतिम देखाव्यात बुडून गेलेला कर्नाटकातील 'बांदीपूर व्याघ्र प्रकल्प' हा पश्चिम घाटांतील उत्तम जैवविविधतेने भरलेल्या जंगलांचं प्रतीक आहे. १९३१ साली म्हैसूरच्या महाराजांचं खासगी शिकारीचं जंगल असलेलं हे वन आज व्याघ्र संरक्षणात एक अत्यंत मोलाचं ठिकाण मानलं जातं. याच जंगलाला पुढे लागून तामिळनाडूतील मुदुमलाई व्याघ्र प्रकल्प आणि नागरहोळेचं जंगलही आहे. तसंच केरळमधील वायनाडचे जंगलही याला लागूनच आहे.

**कशी कराल भ्रमंती :** इथे उघड्या जीपमधून किंवा वनखात्याच्या बसेसमधून वनभ्रमंती करता येते.

**कशासाठी जाल :** वाघ, रानगवा, बिबळा, हत्ती आणि सुमारे २६० पेक्षा जास्त प्रकारचे पक्षी.

**जाण्याचा उत्तम काळ :** डिसेंबर ते मे हा या व्याघ्र प्रकल्पात जाण्याचा सर्वोत्तम काळ आहे.

**वनस्पती :** साग, धावडा, हळदू, बिजा, सावरी, जांभूळ, करू आणि बांबू, वेली, अमरी.

**वन्य प्राणी :** रानटी हत्ती, वाघ, झिपरे अस्वल, हनुमान वानर, बिबळा, चितळ, रानडुक्कर, रानकुत्रा, रानगवा, सांबर, काकर, चौशिंगा, पट्टेरी मानेचा मुंगूस.

**पक्षीजीवन :** सिमीटार सातभाई, मलबार धनेश, हृदय-ठिपक्यांचा सुतार, मोठा काळा सुतार, नवरंग, कोकीळ, चष्मेवाला, चिपका, कापरा, बदकं, मलबार पोपट, मलबार ट्रोगन, रानकोंबडा, मोर.

**सरपटणारे जीव :** नाग, घोणस, बांबू पिट व्हायपर, त्रावणकोर कासव, मांजऱ्या, घोरपड, सापसुरळी.

**कुठे-काय बघाल :** इथे मोयार नदीच्या काठाजवळ हत्ती, रानगवे अशा जनावरांची बरीच वर्दळ असते.

**आसपासची बघण्यायोग्य स्थळं :**

१) मुदुमलाई व्याघ्र प्रकल्प

२) नागरहोळे व्याघ्र प्रकल्प

**कसे जाल :**

**जवळचे विमानतळ :** बेंगलोर (२२० कि.मी.)

**जवळचे रेल्वे स्टेशन :** नांजनगुडा (६५ कि.मी.)

**जवळचे बस स्थानक :** बांदीपूर

इथे म्हैसूर-उटी मार्गावर जाण्याऱ्या सगळ्याच बसेस थांबतात.

**कुठे राहाल :**

१) वनविश्रामगृह (पाच रूमचे)

फोन नं. : ०८२२९-२३६०४३


२) टस्कर ट्रेल रिसॉर्ट

फोन नं. : ०८२२९-२३६०५५

३) बांदीपूर सफारी लॉज

फोन नं. : ०८२२९-२३३००१

✦




**अरण्याबद्दल थोडंसं :** भारताच्या काही अतिशय जुन्या संरक्षित क्षेत्रांपैकी एक असलेले नागरहोळे हे १९५५ साली संरक्षित घोषित केलेले जंगल आहे. नागरहोळेचा स्थानिक भाषेतील अर्थ 'सर्पनदी' असा होतो. या अरण्याचा विस्तार ६४५ चौ.कि.मी. मध्ये झालेला असून १९९२ साली याला राजीव गांधींचे नाव देण्यात आले. निलगिरी बायोस्फियर रिझर्व्हमध्ये येणाऱ्या या जंगलाला पश्चिमी घाटांचं वैभव लाभलेलं आहे. यात नागरहोळे, काभिनी आणि लक्ष्मणा या तीन नद्यांचं पाणलोट क्षेत्र येतं. अत्यंत सुंदर निसर्गवैभवाने नटलेलं नागरहोळे पर्यटकांच्या आकर्षणाचं प्रमुख केंद्र बनलं आहे.

**कशी कराल भ्रमंती :** या जंगलात वनविभागातर्फे मिनीबस सफारी आणि विराणाहोशाहल्ली इथून जीप सफारीची सोय केलेली आहे.

**कशासाठी जाल :** रानटी हत्ती, रानकुत्रा, वाघ, बिबळे आणि अनेक प्रजातींचे पाणपक्षी.

**जाण्याचा उत्तम काळ :** नोव्हेंबर ते मार्च हा या व्याघ्र प्रकल्पाला भेट देण्याचा उत्तम काळ आहे.

**वनस्पती :** बहावा, सावरी, वड, अंजीर, पिंपळ, साग, भेरा, धावडा, करू, बांबू, वेली, गवत, अमरी.

**वन्य प्राणी :** वाघ, बिबळा, रानटी हत्ती, पाणहुदाळे, रानकुत्रा, चितळ, काकर, पट्टेरी मानेचा मुंगूस, सांबर, रानगवा, चौशिंगा, रानडुक्कर, वानर.